# 1 तीमथ्याला

1 Timothy

# 1 तीमथ्याला

## *पौलाचें तीमथ्याला पहिले पत्र*

## 1

1 पौलाकडून, जो आपला उद्धारकर्ता परमेश्वर आणि आपली आशा ख्रिस्त येशू यांच्या आज्ञेनें ख्रिस्त येशूंचा प्रेषित
आहे,
2 तीमथ्याच्या नांवे, जो विश्वासाद्वारे माझा खरा मुलगा आहे, पिता परमेश्वर आणि आपले प्रभू ख्रिस्त येशू यांच्याकडून
तुला असीम कृपा (अनुग्रह) दया आणि शांति असो.
3 मी मासेदोनियाला जातांना तुला समजाविले होते की तू इफिसांत राहून कांही लोकांना आज्ञा कर, की त्यांनी दुसरी
कोणतीही शिकवण (सिद्धांत) देऊ नये. 4 त्या खोटया कहाण्यांकडे आणि अगणित वंशावळयांकडे आपले लक्ष लावूं
नये, ज्यामुळे तंटे होतात, ज्या परमेश्वराच्या त्या योजनेनुसार नाहीत, ज्यांचा संबंध विश्वासाशी आहे. 5 आज्ञेचा हेतू असा
आहे की शुद्ध अंतःकरण, चांगला विवेक व निष्कपट विश्वासाने प्रेम उत्पन्न व्हावे. 6 हे सर्व सोडून बरेच लोक व्यर्थ
गोष्टींमध्ये जणूं कांही भटकून गेले आहे. 7 त्यांना धार्मिक शिक्षक (नियमशास्त्र शिकविणारे) व्हावयाचे तर आहेत, परंतु
ज्या गोष्टी ते बोलतात आणि खात्रीने (ठासून) सांगतात त्याविषयी त्यांना कांही समजत देखील नाही.
8 परंतु आपल्याला ठाऊक आहे की जर एखाद्याने नियमशास्त्राचा योग्य रीतिने उपयोग केला तर ते चांगले आहे.
9 आणि आपल्याला हे देखील माहीत आहे की नियमशास्त्र विश्वासींसाठीचे (नीतिमान ठरविलेले) नाही, पण अधर्मी,
मनांस वाटेल तसे वागणारे, भक्तिहीन, अपराधी, अपवित्र व अशुद्ध लोक, आई-बापाला जिवें मारणारे, हत्यारे,
10 व्यभिचारी, पुमैथून करणारे, मनुष्य-व्यापार करणारे, लबाड व खोटी शपथ वाहणारे, आणि खऱ्या संदेशाच्या सर्व
विरोधकांसाठी नेमलेले आहे; आणि 11 धन्यवादयोग्य, परमधन्य परमेश्वराच्या गौरवाच्या त्या सुवार्तेनुसार आहे, जी
मला सोपविलेली आहे.
12 मी आपल्या प्रभू ख्रिस्त येशूंचे आभार मानितो ज्यांनी मला ही योग्यता बहाल केली आणि ज्यांनी मला विश्वसनीय
मानून आपल्या सेवेकरितां नेमले. 13 मी तर पूर्वी निंदा करणारा, छळणारा आणि अन्याय करणारा होतो, तरी माझ्यावर
दया झाली, कारण मी केवळ धार्मिक उत्साहाने, न समजून अज्ञानतेमुळे ही सर्व कामें केली होती. 14 आपल्या प्रभूची
महान कृपा, त्या विश्वास व प्रेमांसह जी ख्रिस्त येशूंमध्ये आहे माझ्यावर बहुत अधिक झाली.
15 ही गोष्ट खरेपणाने विश्वास करण्यायोग्य आणि प्रत्येक दृष्टीने स्वीकार करण्याजोगी आहे की ख्रिस्त येशू
अपराध्यांना मुक्ति देण्यासाठी जगात आले, ज्यांच्यामध्ये सर्वांत मोठा अपराधी मी आहे. 16 परंतु माझ्यावर केवळ
यासाठीच दया झाली, की मी जो सर्वांत मोठा अपराधी आहे, त्या माझ्याविषयी, येशू ख्रिस्तांनी, आपली पूर्ण
सहनशीलता दाखवावी, ती याकरितां, की जे लोक येशू ख्रिस्तांवर, अनंत जीवनासाठी विश्वास ठेवणार आहेत,
त्यांच्याकरिता मी एक नमूना व्हावे. 17 आता सनातन राजा अर्थात अविनाशी, अदृश्य आणि तो जो एकमेव ज्ञानी
परमेश्वर आहे, त्याचा आदर व गौरव भविष्यकाळी येणाऱ्या सर्व युगांपर्यंत होत राहो. होय, असेच होवो.
18 तीमथ्या, माझ्या मुला, तुझ्याकरितां माझा आदेश हाच आहे की तुझ्याविषयी पूर्वीच झालेल्या भविष्यवाणीनुसार तू
उत्तम प्रकारे झुंज (युद्ध) देत लढत रहावे, 19 आणि विश्वास व तो चांगला विवेक जपून ठेवावास. जो अनेकांनी दूर केला
(बाजूला सारला) आणि ज्याच्यामुळे अनेकांचे विश्वासरूपी जहाज फुटून बुडाले. 20 हुमनाय व अलेक्सांद्र हे
त्यांच्यापैकीच आहे ज्यांना मी सैतानाच्या स्वाधीन केलेले आहे जेणेकरून परमेश्वराची निंदा करण्याचे सोडून देण्याचा
(न करण्याचा) धडा त्यांना शिकविला जावा.

# 2

1 आता सर्वप्रथम मी असे निवेदन करितो की सर्व माणसांकरिता विनंती, प्रार्थना, मध्यस्थी आणि उपकारस्तुति केली
जावी. 2 आपल्याला संपूर्ण शांतीने, सुभक्तीने व परमेश्वराप्रत भययुक्त आदर बाळगून, जीवन जगता यावे म्हणून, राजे
(नेते) अधिकारीगण व सर्व उच्च-पदस्थांकरिताही ती केली जावी. 3 असे करणे आपल्या मुक्तिदाता परमेश्वराला चांगलेही
वाटते आणि प्रियही वाटते (आवडते). 4 सर्व माणसांचा उद्धार व्हावा आणि त्यांनी सत्य उत्तम रीतिने ओळखून घ्यावे
हीच त्याची इच्छा आहे. 5 कारण एकच परमेश्वर आहे, आणि परमेश्वर व मनुष्य यांच्यामध्ये देखील एकच मध्यस्थ
आहे, अर्थात ख्रिस्त येशू जे मनुष्य आहेत. 6 ज्यांनी सर्वांच्या सुटकेसाठीचे मोल म्हणून आपल्या स्वतःला खंडणी रूपात
देऊन टाकले आणि योग्य समयी याविषयीची साक्ष दिली गेली.

7 मी सत्य बोलतो आहे, खोटे बोलत नाहीये, की याच साक्षीसाठी मी, संदेश देणारा, प्रेषित, इतर जातींकरितां विश्वास
व सत्याचा उपदेशक म्हणून नेमलो गेलो.

8 म्हणून माझी अशी इच्छा आहे की प्रत्येक ठिकाणी माणसाने राग आणि विवाद सोडावा आणि आपले पवित्र हात
वर करून प्रार्थना करावी.

9 त्याच प्रकारे स्त्रियांनी देखील शालीन, संयत व सभ्य वस्त्र परिधान (नेसणे) करावेत, केस गुंफून, सोने, मोत्ये आणि
बहुमूल्य वस्त्रांनी नव्हे पण चांगल्या कृत्यांनी स्वतःस शोभवावे; 10 कारण ज्या स्त्रिया स्वतःस धार्मिक (परमेश्वर भक्त)
व चांगली कृत्यें (कार्य) करणाऱ्या समजतात, त्यांनी तसे वागणे योग्य देखील आहे.

11 स्त्रियांनी शांत राहून पूर्ण आधीनतेने शिकत जावे. 12 मी असेही म्हणतो की स्त्रियांनी उपदेश करू नये, त्यांनी
पुरूषावर अधिकार गाजवून त्यांना आपल्या आज्ञेआधीन करू नये, पण शांत रहावे. 13 कारण आदाम प्रथम अस्तित्वांत
(घडला) आला आणि त्यानंतर हव्वा. 14 आणि आदाम फसविला (भुलविला) गेला नाही, परंतु स्त्री फसून अपराधीण
झाली. 15 पण जर त्यां (स्त्रिया) मर्यादा राखून, विश्वास प्रेम आणि पवित्रतेत स्थिर राहिल्यात, तर मुलांना जन्म देत
असताना त्या सुरक्षा प्राप्त करतील.

# 3

1 ही गोष्ट सत्य आहे की जो कोणी देखरेख करणारा होऊ इच्छितो, तो चांगल्या कामाचीच इच्छा बाळगतो. 2 यास्तव
देखरेख (मेंढरें चारणारा) करणारा, आरोप मुक्त, एकाच पत्नीचा पति, संयमी, सुशील, सभ्य, पाहुणचार (उदार-मैत्रीपूर्ण)
करणारा, निपुण शिक्षक असावा. 3 दारू पिणारा किंवा भांडण करून अनावर होणारा, पैश्याचा लोभी नसावा, परंतु
कोमल स्वभावाचा असावा. तो भांडखोर आणि लोभी नसावा. 4 आपल्या स्वतःच्या घराचा उत्तम प्रबंध करणारा आणि
ज्याची मुलें त्याच्या आधीनतेत (मर्यादेत) राहून त्याचा आदर करितात असा असावा. 5 कारण ज्याला आपल्याच घरची
व्यवस्था (देखरेख) व्यवस्थित ठेवता येत नसेल, तो परमेश्वराच्या चर्चचा सांभाळ कसा करू शकेल? 6 दुसरी महत्वाची
बाब ही आहे की, गर्वाने भरून त्याला सैतानाप्रमाणे दंड प्राप्त होऊ नये म्हणून नवीन शिष्याने चर्चची देखरेख करू नये
(नसावा). 7 त्याची निंदा (दोषास्पद रीतिने) होऊन, त्याने सैतानाच्या जाळ्यांत सांपडू नये म्हणून बाहेरच्या लोकांतही
त्याची साक्ष उत्तम असावी;

8 त्याच प्रकारे सेवकांनीही सन्माननीय असावे. त्यांनी दुतोंडी (दुरंगी), दारू पिणारे आणि लोभाने पैसा मिळविणारे
नसावे. 9 परंतु विश्वासाचे रहस्य, शुद्ध विवेक राखून सांभाळणारे असावे. 10 सेवकांचीही, अगोदर पारख व्हावी आणि
त्यानंतर जर ते निर्दोष ठरलेत, तर त्यांनी सेवकाचे कार्य करावे.

11 तसेच त्यांच्या स्त्रिया (पत्नी) देखील आदरणीय असाव्यात; निंदा करणाऱ्या नव्हे पण सौम्य (संयमी) आणि सर्व
गोष्टींविषयी विश्वासयोग्य असाव्यात.

12 सेवक एकाच स्त्रीचा पति असावा; सेवकांचे (सेवकपण) कार्य त्यांनीच करावे ज्यांना आपल्या मुलांबाळांची योग्य
देखरेख कशी करावी आणि आपल्या घरची जबाबदारी उत्तम रीतिने कशी पार पाडावी याविषयी नीट ठाऊक आहे.
13 कारण ज्यांनी सेवकाचे कार्य उत्तमरित्या पार पाडलेले आहे, ते आदरणीय पद (स्थान) व ख्रिस्त येशूंवरील
विश्वासांठायी, भक्कम हिंमत प्राप्त करितात.
14 तुझ्याकडे लवकर येण्याची आशा बाळगून देखील मी तुला या गोष्टी याकरिता लिहीतो आहे, 15 की जर मला
यावयास उशीर लागला तर, परमेश्वराचे जिवंत चर्च जे परमेश्वराचे घर आणि सत्याचा खांब व पाया आहे, त्यांत कसा
व्यवहार (वागणूक) करावा हे तुला नीट समजावे. 16 परमेश्वर जो देहांठायी प्रगट झाला, आत्म्याने नीतिमान् ठरला,
देवदूतांवर प्रगट झाला, गैरयहूदी लोकांना त्याचा संदेश ऐकविला गेला, जगाने त्याच्यावर विश्वास ठेविला, आणि तो
महिमेने वर घेतला गेला, हे जे खऱ्या (सात्विक) जीवनाचे (भक्ति) रहस्य आहे ते मोठे गंभीर आहे, यांत कांही शंकाच
नाही.

# 4

1 परंतु आत्मा स्पष्टपणे (उघडपणे) म्हणतो की, पुढे येणाऱ्या (भविष्यांत) समयांत अनेक लोक फुसलाविणारा आत्मा
आणि दुष्टात्म्यांच्या शिक्षणावर मन लावून विश्वासापासून बहकून (भ्रष्ट) जातील. 2 खोटे व कपटी असल्यामुळे ते ढोंगी
(पाखंडी) होऊन लबाडच्या करतील, त्यांचा विवेक जणूं कांही जळणाऱ्या लोखंडाने डाग दिल्यासारखाच आहे. 3 ते
लग्न (विवाह) करावयाची मनाई करतील, आणि परमेश्वराने उपकारस्तुति करून विश्वासीं व सत्य ओळखणाऱ्या
लोकांकरितां, खाण्याच्या ज्या वस्तु निर्माण केल्यांत, त्यांचे सेवन करू नये अशी आज्ञा देतील. 4 याचे कारण हेच आहे
की परमेश्वराने तयार केलेली प्रत्येक वस्तु चांगली आहे, आणि जर उपकारस्तुति करून (आभार मानून) तिचे सेवन केले
गेले तर कोणतीही वस्तु अस्वीकार करण्यायोग्य नाहीये. 5 कारण ती वस्तु, परमेश्वराचे वचन आणि प्रार्थनेद्वारें शुद्ध होत
असते.
6 जर तू भावांना याविषयी समजावीत राहिलास, तर तू ख्रिस्त येशूंचा उत्तम सेवक ठरशील. विश्वास व त्या सत्य
उपदेशातील शिक्षणाचे ज्याचे तू अनुसरण करीत आला आहेस, त्याद्वारे तुझे पालन पोषण आणि विकास होईल. 7 परंतु
अशुद्ध (परमेश्वरावाचून असलेले) आणि म्हाताऱ्यांच्या कहाण्यांपासून जपून रहा आणि पवित्र जीवनाच्या दिशेकडे
जाण्याचा प्रयत्न करीत पुढे जात रहा. 8 कारण शारीरिक व्यायामाचा लाभ मर्यादित आहे, पण पवित्र जीवन सर्व
बाबतींत फायद्याचे आहे, कारण आतांच्या (वर्तमान) आणि येणाऱ्या जीवनाचे (भविष्य) अभिवचन देखील त्यांतच
आहे.
9 आणि ही गोष्ट सत्य आणि संपूर्णपणे (प्रत्येक दृष्टीने) स्वीकार करण्यायोग्य आहे. 10 कारण परमेश्वरावर आमचा
भरंवसा (विश्वास) आहे, जो सर्व लोकांचा आणि विशेषकरून विश्वासींचा उद्धारकर्ता आहे.
11 या गोष्टींविषयी आज्ञा कर आणि त्या शिकवीत रहा. 12 कोणीही तुझे तरूणपण तुच्छ मानूं नये, परंतु बोलण्यांत,
वर्तन करण्यांत प्रेम, विश्वास आणि पवित्रता यांच्याविषयी विश्वासीं लोकांसाठी आदर्श (नमूना) हो. 13 मी येईपर्यंत वाचन
आणि उपदेश आणि शिक्षणाचे (शिकविण्याचे) कार्य करीत रहा. 14 भविष्यवाणी द्वारे वडील चर्चने तुझ्यावर हात ठेविला
होता त्या समयी तूं कृपादान प्राप्त केले, जे तुझ्यांठायी आहे; त्या कृपादानरूपी बक्षिसाकडे दुर्लक्ष करून त्याविषयी
निष्काळजी होऊ नकोस.
15 तुझी प्रगति व्हावी म्हणून त्या गोष्टींचा विचार (मनन) करीत रहा, त्यांच्यावरच संपूर्णतः आपले लक्ष लावीत रहा;
आपल्याविषयी व आपल्या उपदेशांविषयी सावध रहा. 16 या गोष्टींत तू स्थिर रहा, कारण जर तू असे करीत राहिलास
तर तू स्वतःचे आणि तुझी येशूवार्ता ऐकणाऱ्यांचाही उद्धार साधशील.

# 5

1 कोणत्याही वडील माणसावर रागावूं नकोस, परंतु त्यांना बाप मानून 2 आणि वडील स्त्रियांस आया मानून समजावून
दे. तरूण स्त्रियांना पूर्ण पवित्रतेने बहिणीं समान मानून समजावून दे.
3 त्या विधवांचा सन्मान कर ज्या खरोखरच विधवा आहेत. 4 जर एखाद्या विधवेला मुलें किंवा नातेवंडे असतील तर
त्यांनी प्रथम आपल्याच घराण्यांतील लोकांबरोबर योग्य वागणूक करून आपले आईबाप व इतर वडील चर्चचा सुयोग्य
आदर (हक्क) करून, त्यांचे उतराई होणे शिकावे, कारण हे परमेश्वरास आवडते. 5 जी खरोखरची विधवा आहे आणि
जिचा कोणीच नाही, ती परमेश्वरावर आशा ठेवते, ती रात्रंदिवस विनंती व प्रार्थना करण्यांत तल्लीन असते. 6 पण जर ती
भोगविलासात रमलेली (पडलेली) आहे, ती जिवंत असून मेलेली अशीच आहे. 7 त्यांनी निर्दोष रहावे म्हणून या
गोष्टींविषयी देखील त्यांना आज्ञा देत जा. 8 जर कोणी आपल्या प्रियजनांच्या विशेषकरून आपल्या घराण्याच्या
गरजांकडे लक्ष पुरवीत नसेल, तर तो विश्वासापासून हटला आहे आणि असा मनुष्य अविश्वासीं माणसापेक्षा अधिक
वाईट आहे.
9 त्याच विधवेच्या नांवाची नोंद केली जावी, जी साठ वर्षांहून कमी वयाची नाही, जी एकाच पतीची पत्नी झाली
असेल, 10 जिचे नांव सत्कर्मे करण्यात गाजलेले असेल, जिने मुलांबाळांचे पालन पोषण (संगोपन) केलेले असेल, तसेच
पाहुण्यांची सेवा केलेली असेल, पवित्र लोकांचे पाय धुतले असतील, दुःखी (गरजू) लोकांचे साहाय्य केलेले असेल
आणि सरतेशेवटी जिने सर्व प्रकारचे (प्रत्येक) सत्कार्य मनःपूर्वक केलेले असेल.
11 परंतु तरूण विधवांची नांवे लिहूं नको, कारण जेव्हां त्यां ख्रिस्तांविरूद्ध जाऊन सुख-विलासांच्या आहारी
(आकर्षिल्या) जातात तेव्हां त्यांची इच्छा लग्न करण्याची असते. 12 त्यामुळे त्या दोषी ठरतात, कारण त्यांनी आपला
पहिला विश्वास त्यागून दिलेला आहे. 13 इतकेच केवळ नव्हे तर त्या घरोघरी फिरतात आणि त्यामुळे आळशी होण्याचे
शिकतात आणि केवळ आळशीच नव्हे, तर वटवट करतात, निंदा करीत राहतात, दुसऱ्यांच्या कामात लुडबुड करीत
असतात आणि जे बोलूं नये (अयोग्य असे) ते बोलतात. 14 यास्तव माझी अशी इच्छा आहे की तरूण विधवांनी लग्न
करावे आणि मुलांना जन्म द्यावा, घरच्या जबाबदाऱ्या घ्याव्यात आणि कोणत्याही विरोधकाला बदनामी करण्याची
संधी देऊं नये. 15 कारण अनेक बहकल्या आहेत आणि सैतानामागे अगोदरच निघून गेलेल्या आहेत.
16 जर एखाद्या विश्वासी बंधूच्या किंवा विश्वासी बहिणीच्या येथे विधवा असल्यात, तर त्यांनीच तिच्या गरजा (मदत)
भागवाव्यात, चर्चवर त्यांचा भार पडूं नये, यासाठी की ज्या खरोखरच विधवा आहेत त्यांचे साहाय्य चर्चला करिता
यावे.
17 जे पुढारी उत्तम प्रबंध करितात, विशेषकरून ते जे परमेश्वराचे वचन गाजविण्यासाठी आणि शिकविण्यासाठी मेहनत
करितात, ते दुप्पट आदर योग्य समजले जावेत. 18 कारण पवित्रशास्त्रांत लिहिले आहे, की मळणी करणाऱ्या बैलाचे
नाक व तोंड बांधू नको, कारण मजूर आपल्या (त्याच्या) मजूरीचा हकदार आहे.
19 जर एखाद्या वडिलावर (प्राचीन) दोष लाविला गेला असेल, तर दोन किंवा तीन साक्षीदार असल्यावांचून ऐकूं नको.
20 अपराध करणाऱ्याला सर्वांसमोर फैलावर (रागाने बोलले) घे; म्हणजे बाकीच्या लोकांनाही त्याविषयी भय वाटेल.
21 परमेश्वर आणि येशू ख्रिस्त आणि निवडलेल्या देवदूतांसमोर (हजेरीत) मी तुला बजावून सांगतो, की तू खुल्या
अंतःकरणाने या गोष्टींचे पालन कर आणि कोणतेही कार्य पक्षपाताने करूं नको.
22 उतावीळ होऊन कोणावर हात ठेवूं नको आणि दुसऱ्यांच्या अपराधांत भागीदार होऊ नकोस. आपल्या स्वतःला
पवित्र असा राखून ठेव.
23 भविष्यकाळी नुसते पाणी पिणाराच राहूं नको, परंतु पोट बिघडल्यावर (मळमळ) आणि वारंवार होणाऱ्या आपल्या
आजारांसाठी थोडा-थोडा द्राक्षाचा रस घेत चल.
24 अनेक माणसांची वाईट कृत्यें प्रगट (उघडकीस येतात) होतात आणि ती न्यायाकरितां अगोदरच पोंहचतात, पण

कित्येक लोकांचे तसे होत नाही, त्यांची दुष्टाईनंतर उघडकीस येते. [25] त्याचप्रमाणे कित्येकांची सत्कृत्येंही उघड होतात,
आणि जी उघड नसतात,तीही लपूं शकत नाहीत.

## 6

[1] जितके लोक गुलामीच्या बंधनांत आहेत त्यांनी परमेश्वराच्या नांवाची व उपदेशाची निंदा होंऊ नये, म्हणून
आपआपल्या स्वामीला सर्व प्रकारे मोठ्या आदरांस योग्य असे मानावे. [2] आणि ज्यांचे स्वामी विश्वासी आहेत ते आपले
भाऊ आहेत म्हणून तुच्छ जाणूं नये, तर त्याऐवजी त्यांची आणखी अधिक सेवा करावी, कारण त्यांपासून लाभ घेणारे जे
लोक आहेत ते विश्वासीं व प्रिय आहेत. या गोष्टींविषयी उपदेश देऊन त्या शिकवीत रहा.
[3] जर कोणी दुसऱ्याच प्रकारचा उपदेश देत असेल, आणि खऱ्या गोष्टी अर्थात आपल्या प्रभू येशू ख्रिस्तांविषयीच्या
बाबी आणि तो उपदेश जो भक्तीनुसार आहे, तो नसेल, [4] तर तो व्यक्ती गर्विष्ठ झालेला आहे, आणि त्याला कांहीही
कळत नाही, नव्हे त्याविषयी विवाद व शब्दांवर तर्क करण्याचा त्याचा स्वभाव आहे; या स्वभावामुळे हेवा, तंटे,
निंदनीय गोष्टी, वाईट (दुष्टाईचा) संशय निर्माण होऊन [5] त्यां लोकांत रिकामी (व्यर्थ) भांडणे होऊ लागतात. ज्यांची मति
बिघडलेली आहे, जे सत्यांवाचून रिकामें (निर्धन) झाले आहेत, अशा प्रकारच्या लोकांना वाटते की भक्ति (ख्रिस्ती-सेवा)
कमाईचे साधन आहे.
[6] परंतु शांतिसह (समाधान) असलेले आध्यात्मिक जीवन ही तर मोठी कमाई आहे. [7] कारण आपण जगांत कांही
आणिलेही नाही आणि जगांतून कांही नेऊंही शकत नाही. [8] जर आपल्याजवळ खावयास व नेसावयास आहे तर, त्यांतच
समाधानी असावे. [9] ज्यांना श्रीमंत व्हावयाची इच्छा आहे ते अशा परीक्षेंत, जाळयांत आणि अनेक व्यर्थ व
नुकसानदायक वासनांत फसतात, ज्यामुळे त्यांची हानि होते आणि ते विध्वंसाच्या (विनाशाच्या) समुद्रांत बुडविले
जातात. [10] कारण पैशांचा लोभ सर्व प्रकारच्या वाइटाचें मूळ आहे; ते मिळविण्याचा प्रयत्न करीत अनेक लोक
विश्वासापासून भटकले आहेत आणि त्यांनी स्वतःला पुष्कळ प्रकारच्या दुःखांनी पीडित करून घेतले आहे.
[11] परंतु हे परमेश्वर-भक्तां, तू या गोष्टींपासून पळ आणि धर्म (नीतिमत्व), भक्ति, विश्वास, प्रेम, धीर आणि नम्रता यांचा
पिच्छा (पाठलाग) पुरीव. [12] विश्वासाचे चांगले मल्लयुद्ध (कुस्ती) लढ आणि अनंत जीवन बळकट धर, कारण त्यासाठीच
तुला बोलाविले गेले आणि पुष्कळ साक्षीदारांपुढे तू ज्याचा उत्तम अंगिकार केला होतास. [13] मी तुला परमेश्वर, जो सर्व
प्राणिमात्रांना जीवन प्रदान करितो आणि प्रभू येशू यांच्यासमोर, ज्यांनी पंतय पिलातापुढे स्वतःविषयी उत्तम कबूली
दिली, असा हुकूम देतो की, [14] तू आपल्या प्रभू येशू ख्रिस्तांच्या आगमनापर्यंत (येईस्तोवर) ही आज्ञा निष्कलंक व
निर्दोष अशी राखावीस, [15] जी ते योग्य समयी प्रगट करितील; तेच परमधन्य आणि एकमेव शासक आणि राजांचे राजे व
प्रभूंचे प्रभू (अधिकारी) आहेत. [16] आणि अमरत्व (अमरता) केवळ त्यांचेच आहे, व जे पोहंचण्यापलीकडच्या (अगम्य)
प्रकाशांत राहतात. त्यांना कोणत्याही माणसाने पाहिलेले नाही आणि कधीही पाहूं शकत नाही; त्यांचा मान-सन्मान आणि
राज्य युगानुयुग राहील. होय असेच होवो.
[17] या जगांतील धनवानांस आज्ञा कर की त्यांनी अभिमानी होऊ नये व चंचल संपत्तिवर आशा ठेवूं नये, पण आपल्या
सुखांकरिता सर्व कांही विपुलतेने देणारा जो परमेश्वर त्याच्यावर आशा ठेवावी. [18] त्यांनी जे चांगले ते करावे आणि
सत्कार्यांत श्रीमंत व्हावे. शिवाय दान देण्यांत तत्पर व परोपकार (साहाय्य) करण्यांत पुढे असावे; [19] अनंत जीवन प्राप्त
करण्यासाठी त्यांनी येणाऱ्या समयांकरिता उत्तम आधाराची (पाया) प्रतिक्षा करावी.
[20] हे तीमथ्या, जी शिकवण तुला सोपविलेली आहे, तिचा सांभाळ कर आणि ज्या ज्ञानास ज्ञान म्हणणेच चूकीचे आहे,
तिच्या अशुद्ध रिकाम्या वटवटीपासून (व्यर्थ गोष्टी) आणि विरोधी गोष्टींपासून (विवाद) दूर रहा. [21] बरेच लोक ती
शिकवण स्वीकारून, विश्वासापासून भटकले आहेत. तुझ्यावर असीम कृपा (अनुग्रह) होत असो.